## रे. दि. मु. नं.४४/२००९ मधील निशाणी क्र.१२८ व नि.१३० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.३ आत्माराम रामचंद्र पवार यांचे कायदेशीर वारस मुदतीत अभिलेखावर न घेतलेने झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळणेकरीता व झालेला विलंब माफ होवून मिळण्याकरीता केलेला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथनानुसार, प्रतिवादी क्र.३ आत्माराम रामचंद्र पवार हे दिनांक २३.०८.२०२१ रोजी मयत झाले आहेत. सदर प्रतिवादी क्र.३ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेणे गरजेचे होते. सदरील प्रतिवादी क्र.३ मयत झालेनंतर त्यांचे मृत्युसंबंधी कागदोपत्री पुरावा मिळवो वादी यांना कोरोना विषाणुचे प्रादुर्भावामुळे वेळेत शक्य झाले नव्हते. तसेच वादी हे वयस्कर असलेमुळे वादी यांना त्यासंबंधी कसलीही माहिती कागदोपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्याकारणाने वादी यांना प्रतिवादी क्र.३ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेणे शक्य झाले नाही. दरम्यान त्यांचे विरुध्द दावा अबेट झाला आहे. अबेटमेंट सेट असाईडचा आदेश होवून प्रतिवादी क्र.३ आत्माराम रामचंद्र पवार यांचे वारस रेकॉर्डवर घेणे या दाव्याचा अंतिम निर्णय गुणावगुणावर होणेसाठी आवश्यक आहे. तसे न झाल्यास वादीचे कधीही कशानेही न भरुन येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. सदर अबेटमेंट रद्द होवून वारस रेकॉर्डवरती घेणेकरीता झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे देवून सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणेबाबत कथन केले आहे.

०४. प्रस्तुतचे अर्ज, त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादीतर्फे विधिज्ञ व प्रतिवादी यांचेतर्फे विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द प्रतिवादीने दावा मिळकती वादीच्या वारस हक्काच्या व मालकी वहिवाटीच्या आहेत असे जाहीर होवून मिळणेकरिता तसेच ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी आत्माराम रामचंद्र पवार यांचे मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत नि.१३५ वर दाखल केली आहे. सदर मृत्यू उता–याचे अवलोकन केले असता प्रथमदर्शनी, प्रतिवादी यांचा मृत्यू दिनांक २३.०८.२०२१ रोजी झालेचे दिसून येत आहे. प्रस्तुत दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश २२ क्रम ४ चा विचार करता जर प्रतिवादी याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांच्या विरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला टिकून राहिला तर प्रतिवादीच्या कायदेशीर वारसांना पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीबाबत प्रतिवादीचे वारसांविरुध्द दावा

करण्याचा अधिकार वादीला आहे, असे दिसून येत आहे. सबब, झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन विलंब माफ करणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब झालेचे दिसून येत आहे. त्याकरिता वादीवर खर्च रक्कम रुपये ३००/– लावणे योग्य होईल. यासर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. अर्जाचा खर्च रक्कम रुपये ३००/– वादीने प्रतिवादी यांना द्यावेत.

३. प्रतिवादी आत्माराम रामचंद्र पवार यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

४. प्रतिवादी क्र.३ यांचे वारसांना अभिलेखावर घेणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2022.06.22 17:14:04 +0530

पाटण. (सी.वाय.नेवारे)
दिनांकः २१.०६.२०२२. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटण.